## **Centennial Commemorative Booklet**

चर्च ऑफ द नॅझरीनचा शताब्दी महोत्सव ऑक्टोबर ५, २००८ पुढाऱ्यांसाठी मार्गदर्शन

शताब्दी महोत्सव मुख्य संपादक
गे लेवोनार्ड

बोर्ड ऑफ जनरल सुपरिटेंडेंटस्
पॉल जी. कनिंगहॅम
जेम्स एच. डील
निना जी. गंटर
जेसी सी. मिडनडॉर्फ
जेरी डी. पॉटर
जे. के. वॉरीक

लेखक वर्ग
आर. फ्रँकलीन कूक
मार्क कॉर्क
डेब्बी साल्टर वूडवीन
रॉजर एल. हान
फिलीप हॅम्नर
स्टॅन इंगर मॉल
गे लेवोनार्ड
मार्क लिटलटन
जेसी सी. मिडन्डॉर्फ
शेरी पिनसन
बेसे ''बड'' रीडी (ज्यूनिअर)

अनुवादक : साऊथ एशिया नॅझरीन लिटरेचर कमिटी

सर्व आकडेवारी २००६ च्या अहवालातून घेतलेली आहे.

''पुढाऱ्यांसाठी मार्गदर्शन'' या पुस्तिकेचे तांत्रिक किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्याद्धारे पुन्हा छपाई करण्याची परवानगी फक्त स्थानिक नॅझरीन मंडळ्याना देण्यात आलेली आहे. या लेखन साहित्याचा उपयोग कोणत्याही व्यापारात्मक दृष्टीने न करता फक्त नॅझरीन मंडळ्यामध्ये करावा. या लेखनाचा उपयोग जाहीरातीसाठी, व्यापारी दृष्टीकोनातून, विक्रीसाठी किंवा एखादे कार्य करण्यासाठी होऊ नये. दुसऱ्या मंडळ्यासाठी किंवा संस्थांसाठी या लेखनाचा उपयोग कॉपीराईट असणाऱ्यांच्या लेखी परवानगी शिवाय करु नये. सर्व अधिकार राखलेले आहेत.

कॉपी राईट २००६

नॅझरीन पब्लीशींग हाऊस, कॅनसास सिटी, एम. ओ. अमेरिका.

जे. लेखन नॅझरीन पब्लीशींग हाऊसच्या अधिकारातले नाही त्याची परवानगी नॅझरीन पब्लीशींग हाऊस देत नाही. लेखनाचा मुळ उपयोग करणारा कॉपीराईट परवानगीसाठी जबाबदार आहे.

विशेष स्पष्ट केले नसले तर सर्व शास्त्रभाग मुळात NIV या इंग्रजी पवित्र शास्त्रातून घेतलेले आहेत. व मराठी मध्ये बायबल सोसायटी ऑफ इंडीया ने छापलेल्या पवित्र शास्त्रा मधून घेतलेले आहेत.

# प्रस्तवाना

सर्व ठिकाणच्या नॅझरीन सभासदांना सलाम,

आज १८००० पेक्षा जास्त स्थानिक मंडळ्यामध्ये भक्ती करण्यासाठी आणि शताब्दी महोत्सव साजरा करण्यासाठी जमलेले असताना नॅझरीन मंडळी या शंभर वर्षातील सेवाकार्य व भविष्यातील प्रेरणात्मक आशा साजरी करीत आहे.

ख्रिस्ताचा संदेश व कार्य याद्वारे ओढल्या गेलेले आम्ही नासोरी येशूचे शिष्य आहोत. येशू ख्रिस्ताचे जीवन व कार्य यामुळे आम्ही एकत्र बांधलेले आहोत. पवित्र आत्म्याच्याद्वारे आम्ही उद्धारलेले, क्षमा पावलेले, पवित्र केलेले असे रुपांतरीत झालेले आहोत.

प्रत्येक भाषा बोलणारे, प्रत्येक संस्कृतीत वाढणारे, प्रत्येक जातीचे व प्रत्येक देशात रहाणारे या सर्व लोकांना देवाची प्रीती दर्शविण्यासाठी आम्ही उत्साहीत झालेले आहोत. सर्व जगामध्ये शिष्य तयार करणे हे आमचे सेवाकार्य आहे.

आज ५ ऑक्टोबर २००८ ला ''शताब्दी महोत्सव रविवार'' साजरा करण्याचे बोर्ड ऑफ जनरल सुपरिंटेंडेंन्ट यांनी घोषीत केलेले आहे. ''अनेकातून एक व एकातून अनेक'' हे घोषवाक्य साजरे करीत असतांना आम्ही तुम्हाला आव्हान करतो की तुम्ही जगातील १५१ देशातील (भागातील) बंधू-भगिनी बरोबर एकत्र येऊन हा ऐतिहासिक प्रसंग साजरा करा.

''येशू...हीच आशा'' ही घोषणा देत असतांना हा ऐतिहासिक प्रसंग आम्हाला भविष्यातील अधिक प्रकाशित सेवाकार्यासाठी पुढे नेतो.

बोर्ड ऑफ जनरल सुपरिंटेंडंटस्

# चर्च ऑफ दि नॅझरीन

# शताब्दी महोत्सव

आज आम्ही देवाची भक्ती करत असताना जगभरातील १६ लाख नॅझरीन सभासदांबरोबर शताब्दी महोत्सव साजरा करण्यासाठी आम्ही एकत्र येत आहोत. वेळेच्या २४ भूकटीबंधात १८००० पेक्षा जास्त मंडळ्यामध्ये आम्ही एकत्र येत आहोत.

अनेक देश, अनेक संस्कृती व अनेक भाषा यांच्या विविधतेत आम्ही हा प्रसंग साजरा करीत आहोत.

याप्रसंगी विश्‍वासाद्धारे होणारे तारण व पवित्रतेचे जीवन यामध्ये असणारे आमचे ऐक्य आम्ही साजरे करीत आहोत.

देवाचे त्याच्या मंडळी संबंधीचे या सर्व वर्षातील विश्‍वासूपण आणि भविष्यातील कार्यासंबंधीचे त्याचे अभिवचन आम्ही या प्रसंगी साजरे करीत आहोत.

‘‘पण तुम्ही तर ‘निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वतःचे लोक’
असे आहात, ह्यासाठी की ज्याने तुम्हास अंधकारातून काढून आपल्या
अद्‌भूत प्रकाशात पाचारण केले, त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावे.
ते तुम्ही पूर्वी लोक नव्हता, आता तर देवाचे लोक आहा.....’’

१ पेत्र २:९-१०

शंभर वर्षात केलेली पवित्रतेची घोषणा आम्ही साजरी करीत आहोत.

ऑक्टोबर ५, २००८

# सिद्धांत कलमे

# आम्ही खालील सिद्धांतांवर विश्वास ठेवतो.

### सिद्धान्तकलमे

### १. त्र्येकदेव

१. एकाच अनादि, अनंत, सनातन मर्यादातीत देवावर आम्ही विश्वास ठेवतो. तोच या विश्वाचा सार्वभौम अधिपती आहे तोच एक देव आहे. तो उत्पन्नकर्ता आहे, नियंता आहे, तो स्वभाव, गुण व हेतू यासंबंधाने पवित्र आहे. देव या नात्याने त्याचे मुलभूत व्यक्तित्व त्र्येक असून ते पिता, पूत्र व पवित्र आत्मा असे प्रकट झाले आहे.

### २ येशूख्रिस्त

२. आम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो. तो ईश्वरी त्र्येकत्वातील दुसरी व्यक्ती आहे, तो अनादिकालापासून देवपित्याबराबर एक होता. तो पवित्रआत्म्याने देहधारी झाला व कुमारी मरीयेच्या उदरी जन्मास आला. अशा प्रकारे दोन समग्र आणि सकल परिपूर्ण स्वभाव म्हणजेच देवत्व आणि मनुष्यत्व एकाच व्यक्तीमध्ये संयुक्त झाले उसून तो प्रत्यक्ष देव व प्रत्यक्ष मानव, देवमानव आहे.

येशू ख्रिस्त आमच्या पापांसाठी मरण पावला, तो खरोखर मेलेल्यांमधून उठला आणि त्याने आपला स्वतःचा देह पुन्हा धारण केला, त्या देहाबरोबरच मानवी स्वभाव सकल परिपूर्ण होण्यास आवश्यक ते सर्व गुणही त्याने पुन्हा धारण केले आणि या सर्वासह त्याने स्वर्गात आरोहण केले. तेथे तो आमच्यासाठी मध्यस्थीचे कार्य करीत आहे असा विश्वास आम्ही धरतो.

### ३. पवित्र आत्मा

३. आम्ही पवित्र आत्म्यावर विश्वास ठेवतो. तो ईश्वरी त्रेकत्वातील तिसरी व्यक्ती आहे. तो ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये व मंडळीबरोबर नेहमी उपस्थित राहून प्रभावीरित्या कार्यशील आहे. तो पापासंबंधाने जगाची खातरी पटवतो. पश्चात्ताप करुन विश्वास ठेवणाऱ्यांना तो नवा जन्म देतो, विश्वास ठेवणाऱ्याचे पवित्रीकरण करतो आणि त्यांना येशूमध्ये असलेल्या सर्व सत्यामध्ये चालवतो.

### ४. पवित्र शास्त्रलेख

४. पवित्र शास्त्रलेखांच्या पूर्ण दैवी प्रेरणेवर आमचा विश्वास आहे. पवित्र शास्त्रलेख म्हणजे दैवी प्रेरणेने दिलेली जुना करार व नवा करार यांमधील ६६ पुस्तके. त्यांमध्ये आमच्या तारणास आवश्यक अशा सर्व गोष्टींसंबंधी आमच्याविषयीची देवाची इच्छा, संकल्प अचूकपणे प्रकट केले आहेत. म्हणून त्यांमध्ये जे दिलेले नाही ते विश्वास-सिद्धान्ताचे कलम म्हणून बंधनकारक ठेवता येणार नाही.

### ५.मूळ पाप व व्यक्तिगत पाप

५. आमचे आद्य मातापिता हयांनी केलेल्या आज्ञाभंगामुळे पाप या जगामध्ये आले आणि पापामुळे मरण आले, असा आमचा विश्वास आहे. पाप दोन प्रकारचे आहे. एक -मूळारंभीचे पाप किंवा नीतीभ्रष्टता आणि दोन - प्रत्यक्ष किंवा व्यक्तिगत पाप, असा आमचा विश्वास आहे.

५.१. मूळचे पाप किंवा भ्रष्टता म्हणजे आदामाच्या सर्व संततीचा स्वभावधर्म बिघडल्याचे लक्षण होय. आमचे आद्य मातापिता घडले गेले तेव्हा त्यांची जी शुद्ध अवस्था होती, मूळचे नीतिममत्त्व होते,

त्यापासून प्रत्येक जण दुरावला आहे. परिणामी प्रत्येकाने ईश्वराकडे पाठ फिरवली आहे. प्रत्येकाचे आध्यात्मिक जीवन संपुष्टात आले आहे आणि प्रत्येकाचाच कल सातत्याने पापाकडे आहे, असा आमचा विश्वास आहे. नव्याने जन्म झालेल्यांच्या नवीन जीवनातही मूळ पाप अस्तित्वात असते व पुढे पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने त्याचे निर्मूलन होते, असाही आमचा विश्वास आहे.

५.२. मूळचे पाप व प्रत्यक्ष पापकृती यांमध्ये भेद आहे. मूळ पापामुळे प्रत्यक्ष पाप करण्याची वृत्ती ही वारशानेच आलेली असते. या पापाचा परिहार व्हावा म्हणून देवाने योजिलेल्या उपायाकडे दुर्लक्ष केले किंवा तो फेटाळून लावला, तर मात्र या पापाचा जाब द्यावा लागतो असा आमचा विश्वास आहे.

५.३. प्रत्यक्ष अथवा वैयक्तिक पाप म्हणजे नैतिक दृष्ट्या जबाबदार अशा व्यक्तिने देवाच्या माहीत असलेल्या नियमांचे स्वेच्छेने केलेले उल्लंघन होय, असा आमचा विश्वास आहे. अजाणतेपणे , अपरिहार्यपणे होणाऱ्या चुका, अशक्तपणा, दोष, अपयश किंवा परिपूर्ण वर्तनाच्या प्रमाणापासून विचलित होणे, हे सर्व पतनाचे अवशिष्ट परिणाम आहेत. मुद्दाम, मनाने योजनापूर्वक केलेल्या पापाशी यांचा संबंध नाही. तथापि अजाणतेपणे घडलेल्या या गोष्टींचा कल ख्रिस्ताच्या आत्म्याविरुद्ध असणाऱ्या कृतीकडे, विचारांकडे नाही; या प्रकारच्या कृतींना आत्मिक पापे आहेत असे महणता येईल. वैयक्तिक पाप मूलतः व तत्वतः प्रीतीच्या नियमाचे उल्लंघन आहे आणि ख्रिस्ताच्या संदर्भात पाप म्हणजे अविश्वास अशी व्याख्या करता येईल असा आमचा विश्वास आहे.

## ६. प्रायश्चित्त

६. दुःखसहन, स्वतःचे रक्त सांडणे, वधस्तंभावरील श्रेष्ठ मरण, यांद्धारे येशू ख्रिस्ताने अखिल मानवजातीच्या पापाचे पूर्ण प्रायश्चित केले आहे. हे प्रायाश्चित तारणाचा एकमेव आधार आहे. तसेच ते आदामाच्या वंशातील प्रत्येकास पुरेसे आहे, असा आमचा विश्वास आहे. ज्यांना आपल्या जाबाबदारीची जाणीव नाही आणि जी बालके अजाण आहेत त्यांच्या तारणासाठी हे प्रायश्चित कृपेने परिणामकारक ठरते, परंतु बरेवाईट समजण्याच्या वयात आलेल्या व्यक्तींनी पश्चाताप करुन विश्वास ठेवल्यावरच हे प्रायश्चित त्यांच्या कामी येते असा आमचा विश्वास आहे .

## ७. स्वतंत्र इच्छाशक्ती

७. मानवाला देवाच्या प्रतिरुपाचे असे निर्माण केले, तेंव्हा त्याला बरेवाईट ओळखण्याची शक्तीही मिळाली. म्हणजेच त्याच्यावर नैतिक जबाबदारी आली. आदामाच्या पतनामुळे तो भ्रष्ट झाला. आता त्याच्या अंगी स्वतःच्या शक्तीने व कृतीने माघारे वळून विश्वासाने देवाचा धावा करण्याचे त्राण उरलेले नाही असा आमचा विश्वास आहे. परंतु आमचा असाही विश्वास आहे की, येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाची कृपा सर्व मानवांना विपुलपणे बहाल केली आहे. या कृपेमुळे पापांपासून माघारे वळून , नीतीने जगू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला शक्ती मिळते. परिणामी पापक्षमा व पापशुद्धी यांसाठी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवता येतो आणि त्याच्या दृष्टीने योग्य व त्याला संतोष देणारी अशी चांगली कामे हातून घडतात.

एखाद्या व्यक्तीला नव्याने जन्मल्याचा व संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव येऊनही ती कृपेला अंतरु शकते, ख्रिस्तापासून ढळून भ्रष्ट होऊ शकते आणि अशा व्यक्तीने आपल्या पापाचा पश्चाताप न केल्यास ती सर्वकालच्या नाशप्रत जाते, तिला कसलीच आशा उरत नाही, असा आमचा विश्वास आहे.

## ८. पश्चात्ताप

८. पश्चात्ताप म्हणजे मनाचा पूर्ण पालट, पापाकडे सहजप्रवृत्तीचा मनापासून त्याग करणे, यात स्वतःच्या पापदोषाची जाणीव होणे आणि स्वेच्छेने पापापासून माघारे वळणे यांचा समावेश आहे. जे कोणी कृतीने, हेतुपूर्वक देवाविरुद्ध पाप करुन पापी बनले आहेत अशा सर्वांनी पश्चात्ताप केलाच पाहिजे. पापक्षमा मिळविण्यासाठी, आध्यात्मिक जीवन जगण्यासाठी, विश्वास धरणाऱ्यांना देवाचा आत्मा कृपेने अंतःकरणात अनुताप व दयेची आशा देऊन साहाय्य करतो, असा आमचा विश्वास आहे.

## ९. न्यायीकरण, नवा जन्म व दत्तकपण

९. नीतिमान ठरविले जाणे ही देवाची कृपेची व न्यायीपणाची कृती आहे असा आमचा विश्वास आहे. या कृतीच्या द्वारे तो, जे जे येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून त्याला प्रभू व ताराणारा म्हणून स्वीकारतात, त्या सर्वांना सर्व अपराधांची क्षमा करतो आणि केलेल्या पापांच्या शिक्षेपासून पूर्णपणे मुक्त करतो, असा आमचा विश्वास आहे.

१०. पुन्हा अथवा नव्याने जन्मणे हेही देवाचे कृपेचे कार्यआहे. याच्या द्वारे पश्चात्ताप करुन विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीचा नैतिक स्वभाव आध्यात्मिकरीत्या चेतवण्यात येतो आणि तिला विश्वास, प्रीती आणि आज्ञापालन हे सर्व करण्यास समर्थ असे आध्यात्मिक जीवन देण्यात येते, असा आमचा विश्वास आहे.

११. द्त्तकपण हेही देवाच्या कृपेनेच प्राप्त होते. या कृतीने नीतिमान ठरवलेला आणि नव्याने जन्मलेला विश्वासणारा देवाचा पुत्र या संज्ञेस पात्र होतो आमचा विश्वास आहे.

१२. नीतिमान ठरले जाणे, नव्याने जन्मणे आणि दत्तकपण लाभणे यांचा अनुभव देवाचा शोध करणाऱ्यांना एकाच वेळी येतो. हा अनुभव येण्यासाठी विश्वास आवश्यक आहे व विश्वासापूर्वी पश्चात्ताप होणे जरुरीचे आहे. या कृपेचा कार्याला व स्थितीला पवित्र आत्मा साक्षी आहे असा आमचा विश्वास आहे.

## १०. संपूर्ण पवित्रीकरण

१३. संपूर्ण पवित्रीकरण हे देवाचे कार्य आहे. नवा जन्म झाल्यानंतर घडणाऱ्या या कार्यामुळे विश्वासणाऱ्यांची मूळच्या पापापासून किंवा भ्रष्टतेपासून सुटका होते व ते देवाशी पूर्णतया एकनिष्ठ केले जातात, तसेच प्रीतीने पवित्र आज्ञापालन करण्यास पूर्ण होतात असा आमचा विश्वास आहे.

पवित्रीकरण पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याच्या द्वारे होते. या एकांच अनुभवातून अंतःकरणाची पापासून शुद्धी व हृदयात सतत राहणारी पवित्र आत्म्याची समक्षता या दोन गोष्टी प्रतीत होतात. या समक्षतेमुळेच विश्वासणाऱ्याला समर्थपणे जीवन जगता येते व सेवाकार्य करता येते.

येशूच्या रक्ताने संपूर्ण पवित्रीकरणाची तरतूद झाली आहे. विश्वासंपूर्ण समर्पण केल्यावर लगेच संपूर्ण पवित्त्रीकरण होते. या कार्याला व कृपेच्या अवस्थेला पवित्र आत्मा साक्षी आहे असा आमचा विश्वास आहे.

या अनुभवाला दिलेल्या वेगवेगळ्या नावांवरुन त्याची विविध अंगे व्यक्त होतात. काही नावे अशी -- ''ख्रिस्तभक्ताची परिपूर्णता'',''परिपूर्ण प्रीती'' ''अंतःकरणाची शुद्धता'', पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा, ''आशीर्वादांची परिपूर्ती आणि ''ख्रिस्ती पवित्रता.''

१४. शुद्ध अंतःकरण आणि परिपक्व शील यांमध्ये स्पष्ट भेद आहे, असा आमचा विश्वास आहे. '' शुद्ध अंतःकरण '' क्षणार्धात लाभते. तो संपूर्ण पवित्रीकरणाचा परिणाम आहे. शील परिपक्व होणे हे कृपेत वाढ झाल्याचे फळस्वरुपी आहे, असा आमचा विश्वास आहे.

संपूर्ण पवित्रीकरणाच्या कृपेच्या कार्यामध्येच कृपेमध्ये वाढण्याची प्रेरणा सामावलेली आहे असा आमचा विश्वास आहे. तथापि या प्रेरणेची जाणीवपूर्वक जोपासना केली पाहिजे आणि आध्यात्मिक विकासासाठी आवश्यक गोष्टींकडे काळजीपूर्वक ध्यान दिले पाहिजे व आध्यात्मिक विकासाची प्रक्रिया, शील व व्यक्तित्व सुधारुन ते ख्रिस्तसदृश होते आहे याकडेही विशेष लक्ष देणे जरुर आहे. अशा प्रकारे जाणीवपूर्वक प्रयत्न न केले तर एखाद्याच्या साक्षीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन कृपाही विफल होऊन अखेर नाहीशी होइल.

## ११. सार्वत्रिक मंडळी

१५. आम्ही मंडळीवर विश्वास ठेवतो. मंडळी म्हणजे येशू ख्रिस्त प्रभू आहे असे मान्य करणाऱ्या लोकांचा समूह , ख्रिस्तामध्ये नवे केलेले देवाच्या कराराचे लोक, वचनाच्याद्धारे पवित्र आत्म्याने एकत्र पाचारण केलेले ख्रिस्तशरीर.

देवाने मंडळीला पाचारण केले आहे ते तिने आत्म्याच्या सहभागितेमध्ये ऐक्याने जीवन व्यतीत करावे म्हणून वचनाचा उपदेश, संस्काराचे पालन आणि त्याच्या नावाने सेवा करणे यांद्धारे तिने उपासना करायची आहे आणि परस्परांना जबाबदार राहून ख्रिस्ताच्या आज्ञा पाळावयाच्या आहेत.

पवित्र जीवनक्रम, सुवृत्तप्रसार, शिष्यत्व आणि सेवा यांच्या द्धारे पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने या जगामध्ये ख्रिस्ताचे उद्धारकार्य सतत चालू ठेवणे हेच तिचे जीवित कार्य आहे.

मंडळी ऐतिहासिक वास्तवता आहे, ती संस्कृतींशी निगडीत अशा रुपात संघटित होते- उपासकांचे स्थानिक समूह व विश्वव्यापी संघटना अशी ती आहे. देवाने विशिष्ट सेवाकार्यासाठी पाचारण केलेल्या व्यक्तींना ती वेगळे करते, सेवेस सज्ज करते -पाठवते. आमचा प्रभू येशू येईल तेंव्हा सर्व पूर्णतेस जाईल या आशेने देवाच्या अधिकाराखाली राहण्यास मंडळीला पाचारण झालेले आहे.

## १२.बाप्तिस्मा

१६. आमच्या प्रभूने नेमून दिलेला ख्रिस्ती बाप्तिस्मा हा एक संस्कार आहे. येशू ख्रिस्ताने केलेल्या प्रायश्चित्ताच्या लाभाचा स्वीकार यावरुन सूचित होतो. बाप्तिस्मा विश्वासणाऱ्यांना देण्यात यावा याच्याद्धारे तारणारा म्हणून त्यांचा येशू ख्रिस्तावरील विश्वास जाहीर होतो. तसेच पवित्रतेने व धार्मिकतेने आज्ञापालन करण्याचा त्यांचा हेतूही याच्याद्धारे पूर्णता व्यक्त होतो, असा आमचा विश्वास आहे.

बाप्तिस्मा नव्या कराराचे चिन्ह आहे म्हणून मुलांच्या आईवडिलांनी किंवा पालकांनी आम्ही त्यांना (मुलांना) आवश्यक ते ख्रिस्ती शिक्षण देऊ असे आश्वासन देऊन विनंती केल्यास लहान मुलांचा बाप्तिस्मा करावा.

विनंती करणाऱ्यांच्या इच्छेनुरुप बाप्तिस्म्याचा विधी पाणी शिंपडून, ओतून अथवा पाण्यात संपूर्ण बुडवून करण्यात यावा.

## १३. प्रभूभोजन

१७. आमचा प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याने त्याच्या स्मरणार्थ व सहभागितेसाठी स्थापन कलेले भोजन मूलतः नव्या कराराचा संस्कार आहे असा आमचा विश्वास आहे. या संस्काराच्या द्धारे प्रभूने कलेले बलिदान जाहीर होते. या मरणाच्या गुणांनी विश्वासणाऱ्यांना जीवन, तारण व सर्व आध्यात्मिक आशीर्वाढ मिळण्याचे अभिवचन ख्रिस्तामध्ये प्राप्त होते. या संस्काराचे महत्व व हेतू नम्रतेने व आदरपूर्वक समजण्यास, आचरण्यास तयार आहेत त्यांच्यासाठीच हा योजिला आहे. याच्या द्धारे ते प्रभू परत येईपर्यंत त्याच्या मरणाची घोषणा करतात. हे सहभागितेचे भोजन आहे. तेंव्हा ख्रिस्तावर विश्वास ठेवून पवित्र जनांसंबंधी अत'करणात प्रीती असेल अशाच व्यक्तींना यात भाग घेण्यासाठी बोलवावे.

## १४. देवाच्या सामर्थ्यांने रोगनिवारण

१८. देवाच्या सामर्थ्याने रोगनिवारण होते या पवित्र शास्त्रातील सिद्धान्ततत्वावर आमचा विश्वास आहे आणि रोगी बरे व्हावेत म्हणून विश्वासाने प्रार्थना करावी असे आम्ही आमच्या लोकांना आग्रहाने आवाहन करतो. देवाने दिलेली साधने, उपचार साहित्य (औषधे, डॉक्टर इ.) जेंव्हा आवश्यक वाटेल, तेंव्हा त्यांचा उपयोग करावा, त्यास मनाई करु नये.

## १७. ख्रिस्ताचे दुसरे येणे

१९. प्रभू येशू ख्रिस्त पुन्हा येणार आहे असा आमचा विश्वास आहे. त्याच्या आगमनसमयी आम्ही जे ख्रिस्त येशूमध्ये महानिद्रा घेत आहेत त्यांच्यापुढे जाणार नाही. तथापि आम्ही त्याच्यामध्ये राहत असू. तर उठवलेल्या पवित्र जनांबरोबर, प्रभूला सामोरे होण्यासाठी आम्हांलाही वर अंतराळात घेण्यात येईल, म्हणजे मग आम्ही सदासर्वकाळ प्रभूजवळ राहू.

## १६. पुनरुत्थान, न्यायनिवाडा व भवितव्य

२०. मृतांचे पुनरुत्थान होईल, धार्मिक व अधार्मिक अशा दोघांचेही देह सजीव उठवून त्यांच्या त्यांच्या आत्म्याबरोबर संयुक्त करण्यात येतील असा आमचा विश्वास आहे '' ज्यांनी सत्कर्मे केली, ते जीवनाच्या पुनरुत्थानासाठी व ज्यांनी दुष्कर्मे केली, ते न्यायाच्या पुनरुत्थानासाठी बाहेर येतील ....''

२१. भावी काळात न्यायनिवाडा होईल, त्या वेळी प्रत्येक मनुष्य या जीवनातील आपआपल्या कर्मानुसार न्यायनिवाडा व्हावा म्हणून देवासमोर उभा राहील असा आमचा विश्वास आहे.

२२. आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्यावर तारणासाठी विश्वास ठेवून त्याला आज्ञाशीलतेने अनुसरतात त्या सर्वांना गौरवी सार्वकालिक जीवनाचे आश्वासन दिले आहेः तसेच जे अखेरपर्यंत पश्चाताप करणार नाहीत ते सर्वच नरकांत सदासर्वदा यातना भोगतील असा आमचा विश्वास आहे.

http://nazarene.org/ministries/administration/visitorcenter/articles/display.aspx

# एक व अनेक यांचे शतक

लग्न सोहळा असा प्रसंग आहे की ज्यामध्ये अस्तित्वात असलेली कुटूंबे व नविन तयार झालेले कुटुंब यांचा संबंध जोडला जातो. नॅझरीन शताब्दी महोत्सव हा तशाच प्रकारचा सोहळा आहे. एका शतकापूर्वी नॅझरीन लोक म्हणजे प्रमुख्याने असे अमेरिकन कुटुंब होते की ज्यांचे काही नातेवाईक परदेशात होते. आज आम्ही प्रत्येक लोकवस्ती असलेल्या खंडामधील मंडळ्यांचे आंतरराष्ट्रीय कुटूंब आहोत. कोणतीही भाषा बोलणारे, कोणत्याही वंशातील व कोणतेही राष्ट्रीयत्व असणारे लोक असे म्हणत नाहीत की आम्ही बहूसंख्य आहोत.

## अनेकातून एक - पवित्रतेतील एकता

पवित्रतेची चळवळ आणि पवित्रतेच्या जीवनावर दिलेला भर यांचे प्रगटीकरण म्हणून आमच्या मंडळीचे संस्थापक एकत्र आले व त्यांनी एक समाज, एक मंडळी तयार केली. सुरुवातीच्या नॅझरीन लोकांनी आपला ''आध्यात्मिक दृष्टांत'' जॉन वेस्लेच्या महत्त्वाच्या सिद्धांतापासूनच घेतलेला आहे. ''विश्वासाने देवाच्या कृपेद्धारे आम्ही न्यायी ठरतो, विश्वासाने, देवाच्या कृपेने पवित्रीकरण होते. आणि मनुष्याच्या जीवनात पवित्र आत्म्याचे कार्य दिसून येते'' हाच त्या सिद्धांताचा गाभा होय. १८३० च्या सुमारास जी पवित्रतेची चळवळ सुरु झाली त्या चळवळीने ह्याच सिद्धांताचा पुरस्कार केला. १९०० च्या आसपास मात्र या सिद्धांतासंबंधी छकले पडली.

फिनिआस एफ ब्रीझी, सी. बी. जरनिगन, सी. डब्ल्यू.रुथ आणि इतर समर्पित पुढाऱ्यांनी ही छकले जोडण्याचा प्रयत्न केला.

- असोसिएशन ऑफ पेंटीकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका आणि चर्च ऑफ दि नॅझरीन, ऑक्टोबर १९०७ मध्ये शिकॅगो, इलीनॉइस येथे पहिल्या जनरल असेंब्ली मध्ये एकत्र आले.
- एप्रिल १९०८ मध्ये पनिएल, टेकसास या ठिकाणी जी एक मंडळी तयार झाली, तिने होलीनेस असोसिएशन ऑफ टेकसासच्या अनेक पुढाऱ्यांना आकर्षित केले.
- सप्टेंबर १९०८ मध्ये पेनसिल्वानिया, कॉन्फरन्स ऑफ दि होलीनेस ख्रिश्चन चर्च आपल्या मंडळीत (नॅझरीन) येऊन मिळाले.
- ऑक्टोबर १९०८ मध्ये होलीनेस चर्च ऑफ ख्राईस्ट चे मुख्यालय पायलट पॉईंट, टेकसास या ठिकाणी दुसरी जनरल असेंब्ली झाली व या ठिकाणीच होलीनेस चर्च ऑफ ख्राईस्ट नॅझरीन मध्ये येऊन मिळाले.
- १९०५ मध्ये पेन्टीकॉस्टल चर्च ऑफ स्कॉटलंड आणि पेन्टीकॉस्टल मिशन नॅझरीनमध्ये येऊन मिळाले व याबरोबरच सात संप्रदाय (मिशन संस्था) व इतर दोन गटाचे कांही भाग यांचे एकत्रीकरण झाले.

## एकातून अनेक - जागतिक मिशन कार्य

वरील प्रकारच्या ऐक्यातून चर्च ऑफ दि नॅझरीन पुढे गेले व अनेक संस्कृती व भाषांमधील लोकगटापर्यंत जाऊन पोहंचले. १९०८ मध्ये अमेरिका व कॅनडा येथे अनेक मंडळ्या होत्या तसेच भारत, केप वर्दे, मेक्सिको आणि जपान येथे स्थापीत कार्य होते व त्यानंतरच अफ्रिका व चिन येथेही कार्याला सुरुवात झाली. एच. एफ. रेनॉल्डस, जनरल सुपरिंटेंडेंट यांनी ''संपूर्ण जगामध्ये सुवार्ता कार्ये'' या तत्त्वाचा पुरस्कार केला व ही बाब नॅझरीनच्या जीवनातील वैशिष्ट्य झाले.

पुढे नॅझरीन मंडळीचे अनेक संस्कृती व अनेक भाषा यांच्या विविधतेमध्ये वाढ होत गेली व १९८० मध्ये ''आंतरराष्ट्रीयत्व'' या तत्त्वाचा स्विकार केला गेला. ''आंतरराष्ट्रीयत्व'' म्हणजे जगातील अनेक स्थानिक मंडळ्या मिळून बनलेली एक जागतिक मंडळी. इतर प्रोटेस्टंट मंडळ्या जशा इतर देशांमध्ये वेगवेगळया झाल्या तसा हा प्रकार नाही. २००१ च्या जनरल असेंब्लीनुसार ४२% प्रतिनिधी हे इंग्रजी ही दुय्यम भाषा म्हणून बोलणारे अथवा न बोलणारे होते. आज ६०% नॅझरीन लोक, ८०% मंडळ्या व ४२८ प्रांत हे अमेरिकेच्या बाहेर आहेत.

या नविन शतकामध्ये आमच्या पुढे अनेक आव्हाने आहेत, परंतू आमचा मार्ग आम्हास ठाऊक आहे. आम्ही एक मंडळी असून अनेकांच्या शोधात आहोत. अनेकांचे चर्च असून आम्ही एक आहोत.

# आम्ही साजरे करीत आहोत....

# ''मिशन कार्याचे शतक''

चर्च ऑफ नॅझरीन हे एक ''जागतिक कुटूंब'' आहे. १९०८ मध्ये जेव्हा अनेक मंडळ्या/गट एकत्र आले तेव्हा अमेरिका, भारत (१९९८), केप वर्दे (१९०१), कॅनडा (१९०२), मेक्सिको (१९०३) आणि जपान (१९०७) येथे स्थापित कार्य होते ग्वाटेमाला (१९०१), क्युबा (१९०२) आणि स्कॉटलँड (१९०६) येथील कार्य व तिन गट १९१५ मध्ये एकत्र आले.

आज चर्च ऑफ दी नॅझरीनचे ''वर्ल्ड मिशन खाते'' वेगवेगळया देशातील प्रभूचे कार्य करणाऱ्याबरोबर सहभागी होण्यासाठी शेकडो मिशनरी पाठवत आहे की जे प्रत्येक खंडामध्ये ज्या ठिकाणी लोकवस्ती आहे तेथे पवित्रतेचा संदेश नेत आहेत. सध्या नॅझरीनचे कार्य जगात ''सहा विभागा'' मध्ये विभाजीत करण्यात आलेले आहे. प्रत्येक विभागामध्ये ''वर्ल्ड मिशन'' च्या द्वारे देखरेख करणारा विभागीय संचालक (रिजनल डायरेक्टर) नेमलेला आहे, हे सहा विभाग म्हणजे,. आफ्रीका, एशिया-पॅसिफीक, कॅरीबीयन, युरेशिया, मेक्सिको व सेंट्रल अमेरिका, आणि दक्षीण अमेरिका हे होत.

'वर्ल्ड मिशन खाते' खालील साधनाच्या द्वारे जागतिक / आंतरराष्ट्रीय मंडळीला मदत करते.

- वर्ल्ड मिशन लिटरेचर : पवित्रतेचा संदेश देणारे साहित्य ९५ भाषांमध्ये आहे.
- कंपॅशनेट मिनिस्ट्री : संकटकाळातील मदत, आणिबाणीच्या वेळचे व्यवस्थापन, लहान लेकराना देण्यात येणारी मदत, अन्न व वस्त्र देण्याचा कार्यक्रम, अनेक काळ टिकणारी उपाययोजना.
- नॅझरीन मिशन्स इंटरनॅशनल : शिक्षण, प्रार्थना व मदत कार्य
- वर्ल्ड मिशन कम्युनिकेशन्स् : रेडीओ, व्हीडीओ निर्मिती, आणि इंटरनेट
- शैक्षणिक कार्य : पाळकीय सेवक व ले सभासद यांना प्रशिक्षण
- वर्क अॅन्ड विटनेस : हँडस् ऑन, शॉर्ट टर्म मिशन (अल्प काळ कार्य), मिशन कॉर्प्स, व्हालंटीअर मिशन्स (स्वयं सेवकांचे कार्य) युथ इन मिशन आणि युथ सर्व्ह स्टुडंट शॉर्ट टर्म मिनिस्ट्रीज या सेवांद्धारे कार्य.
- जीजस फिल्म, हार्वेस्ट पार्टनर्स : या द्धारे १९९८ पासून ५० लाख पेक्षा जास्त लोकांनी ख्रिस्ताचा स्विकार केला व जवळ जवळ ८००० नविन मिशन-मंडळ्या तयार झाल्या.

http://nazarene.org/ministries/administration/visitorcenter/articles/display.aspx

ज्याला आम्ही पूर्वी ''गृह विभाग'' (Home Mission) व 'परदेशी विभाग' (Foreign Mission) असे म्हणत होतो त्या दोहोंना  मिळून आता ''जागतिक मिशन विभाग''् (Global Mission) असे म्हणण्यात येते.  या मध्ये अमेरिका व कॅनडा यांचा समावेश आहे. या १०० वर्षानंतर जवळ जवळ अमेरिकेतील प्रत्येक शहर व प्रत्येक समाजापर्यंत नॅझरीन कार्य पोहंचले आहे.

स्थानिक मंडळ्यांना व प्रांतांना मिशन कार्यासाठी खालील साधनांचा उपयोग करण्यास मदत करणे.  हे ग्लोबल मिशन चे कार्य आहे.

- पाळकीय सेवकाचा विकास : नविन सेवकांची नेणूक, तयारी, पवित्रतेची वार्ता सांगण्यासाठी मिशनरी कार्य करणाऱ्या पुढाऱ्यांना मदत.
- मिशन कार्याची योजना : विविध संस्कृतीतील कार्य, शहरी भागातील कार्य तसेच दयार्थ सेवा इत्यादी द्वारे अमेरिका व कॅनडा यादेशात स्थलांतरीत झालेल्यांमध्ये कार्य.
- सुवार्तेची साधनेः हरवलेल्यांना ख्रिस्तासाठी जिंकणे, आणि त्यांना शिष्य करणे.

  नॅझरीन मंडळीचा शताब्दी महोत्सव साजरा करत असतांना New Start या योजनेखाली १००० नविन मंडळ्यांची स्थापना झाली. आज अमेरिका व कॅनडा या देशांमध्ये खालील बाबतीत महत्त्वाची वाढ झालेली आहे.

- ६००० मंडळ्या
- ७,५०,००० सभासद
- ५,००,००० सण्डे स्कूलची उपस्थिती
- ८,००,००० उपासनेची उपस्थिती

http://nazarene.org/ministries/administration/visitorcenter/articles/display.aspx

# आम्ही साजरे करीत आहोत....

# ''शिक्षणाचे शतक''

सुरुवातीलाच पवित्रतेच्या सिद्धांतावर विश्वास ठेवणाऱ्या पुढाऱ्यांनी अनेक विश्वविद्यालये, सेमिनरीज आणि कॉलेजेसची स्थापना १९ व्या शतकाच्या शेवटी केलेली होती व १९०८ मध्ये जनरल असेंब्लीच्या वेळी केवळ १०,००० सभासद असतांना एकूण १४ शैक्षणिक संस्था स्थापीलेल्या होत्या. आपले पहिले जनरल सुपरिंटेंडेंट डॉ. फिनिआस ब्रीझी म्हणाले ''आपले उच्च शिक्षण हे असल्याप्रकारचे आहे की जर मंडळीने ते सरकारला किंवा इतर संस्थांना हस्तांतरित केले तर त्यांना हे समजून येईल की मंडळीने त्यांचा वारसा हिरावून घेतलेला होता.''

याच शैक्षणिक वारशानुसार आज चर्च ऑफ दि नॅझरीनचे ४० देशांमध्ये ५६ कॉलेजेस, सेमिनरीज व विश्वविद्यालये आहेत.

४०,००० पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांची आज जगात आपल्या शैक्षणिक संस्थामध्ये नोंदणी झालेली आहे. (यामध्ये निवासी व विस्तारित वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे). प्रत्येक शैक्षणिक पातळीवर आपल्या शैक्षणिक संस्था योग्य दर्जाचे पाळकीय शिक्षण तसेच इतर शिक्षण देतात. या शिक्षण संस्था पाळकीय सेवक वर्ग, मिशनरीज व ले-सभासद तयार करतात. त्यांचा प्रभाव सुवार्ताप्रसार, शिष्य बनविण्याचे कार्य व मंडळीचे रोपन कार्य यामध्ये दिसून येतो.

http://nazarene.org/ministries/administration/visitorcenter/articles/display.aspx

# आम्ही साजरे करीत आहोत
# ‘‘स्थानिक मंडळीतील सुवार्ताकार्याचे शतक’’

नॅझरीन मिशन इंटरनॅशनल (आंतरराष्ट्रीय ख्रिस्तवार्ता संघ) हे खाते चर्च ऑफ द नॅझरीनच्या परदेशी विभागाचा (वर्ल्ड मिशन) मुख्य गाभा आहे. या ख्रिस्तवार्ता संघाची सुरुवात १८९९ मध्ये आठ स्त्रीयांच्या एकत्र येण्याद्धारे झाली. त्यावेळी ‘‘असोशिएशन ऑफ पेन्टीकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका’’ यातील आठ स्त्रीया एकत्र येऊन त्यांनी मिशन कार्याला हातभार लावण्यासाठी हा संघ स्थापन केला. १९०८ मध्ये या संघाचे ४०० सभासद होते. १९१५ ला चौथ्या जनरल असेंब्लीच्या वेळी या संघाला अधिकृतपणे मान्यता देण्यात आली व संस्थेचे नाव ‘‘विमेन्स् मिशनरी सोसायटी’’ (स्त्रियांचा ख्रिस्तवार्ता संघ) असे देण्यात आले. १९५२ मध्ये या संघामध्ये पुरुष, तरुण व लेकरे यांनाही येण्यासाठी दार उघडण्यात आले. या संघाचे नाव अनेक वेळा बदलण्यात आले, उद्देश मात्र तोच राहीला.

आज सर्व स्थानिक मंडळ्यांचे मिळून या संघाचे पूर्ण व सहभागी सभासद म्हणून ८,६०,००० वर सभासद आहेत. या संघाचा (NMI) मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक मंडळंयाच्या सुवार्ताकार्याला प्रोत्साहन देणे. या उद्देशाचे ४ भाग पाडता येतील.

- प्रार्थना : प्रार्थनेसाठी एकत्र जमणे, जागतिक नॅझरीन प्रार्थनेचा आठवडा, आणि छळ होत असलेल्या मंडळ्यासाठी प्रार्थना.
- जागतिक जागृतिकरण : वेगवेगळ्या पद्धतींनी व वेगवेगळ्या साधनांचा उपयोग करुन मिशन कार्याचे शिक्षण देणे.
- लेकरे व तरुण : येणाऱ्या पिढीसाठी ‘‘हन्डरस् ऑन मिशन’’ या विभागाद्धारे कार्य.
- पैशाची उभारणी : जागतिक सुवार्ताकार्यासाठी निधी, अलाबास्त्र दान, वर्ल्ड मिशन ब्रॉडकास्ट खास निधी व इतर दानांच्या द्धारे दरवर्षी जवळजवळ ५ कोटी डॉलर्स जमा करण्यात येतात.

http://nazarene.org/ministries/Administration/visitorcenter/articles/display.aspx

# आम्ही साजरे करीत आहोत.....
# ''पवित्रतेवरील लेखनाचे शतक''

फक्त दोन छपाईचे यंत्रे असतांना भरपूर विश्वास देऊन व समर्पण करुन १९१२ मध्ये अगदी बोटावर मोजता येईल इतक्या लोकांनी चर्च ऑफ दि नॅझरीन साठी लेखन साहित्य पुरविण्यास सुरुवात केली. तेव्हांपासून ''नॅझरीन पब्लीशींग हाऊस'' (NPH) नॅझरीन च्या छपाईसाठीचे व प्रकाशनाचे एक प्रमुख अंग झाले.

पवित्रतेचा संदेश देण्यासाठी व शिकविण्यासाठी आपली पुस्तके, संगीत, मासिके व शैक्षणिक अभ्यासक्रम निर्माण करुन छापण्याचे महत्त्व व किंमत सुरुवातीलाच नॅझरीन पुढाऱ्यांना दिसून आले. पवित्रतेचा संदेश प्रकाशित करण्याचा नॅझरीन पुढाऱ्यांच्या निर्णयाने नॅझरीन मंडळीमध्ये एकत्र आलेल्या सर्व गटांना आणखी मजबूत केले. आज (NPH) नॅझरीन पब्लीशींग हाऊस दरवर्षी २ कोटी ५० लाख पेक्षाही जास्त वेगवेगळे साहीत्य निर्मिती करत आहे.

♦ बीकन हील प्रेस : ख्रिस्ती जीवन, आध्यात्मिक वाढ, पाळकीय व पुढारीपणाचे लेखन साहीत्य व ईश्वरविज्ञान विषयक पुस्तके यांची निर्मिती.

♦ लीलीनास पब्लीशिंग कंपनी : उपासनेचे संगीत, नाटकांची साधने, आणि लेकरांसाठीचे विशेष संगीत व नाटके याची निर्मिती.

♦ वर्ल्ड ॲक्शन पब्लीशिंग कंपनी : सण्डेस्कूल व लहान गटांसाठीचा अभ्यासक्रम, व्ही. बी. एस. कॅरावान व लहान लेकरांच्या उपासनेची साधने याची निर्मिती.

♦ बेअरफूट मिनिस्ट्रीज : तरुणांसाठी शिष्यत्व, आध्यात्मिक घडण व भक्तीची साधने यांची निर्मिती.

www.nph.com

## आम्ही साजरी करीत आहोत....
## ''शिष्यत्वाचे शतक''

१९०७ मध्ये भरलेल्या जनरल असेंब्लीने घोषीत केले ''प्रत्येक सन्डेस्कुल शिक्षकाला ''परिपूर्ण प्रीती'' चा अनुभव असणे आवश्यक आहे की ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थी त्यांच्या (शिक्षकांच्या) जीवंत उदाहरणांवरुन शिकेल''. स्थानिक सन्डेस्कुल मुळेच प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीचा मंडळीत स्विकार करण्यात आला, परस्पर संबंध प्रस्थापित झाले व तारणाचा संदेश प्रत्येक व्यक्तीला कळाला. या प्रकारे लहान गटातील शिष्यत्वाचे कार्य अजुनही सुरु आहे.

सन्डेस्कूल व शिष्यत्वाची सेवा या अशा सेवा आहेत की ज्यामुळे पवित्रतेच्या अनुषंगाने ''ख्रिस्ती शिष्यत्वा'' संबंधीचे सुरुवातीची पाऊले व इतर कार्यक्रम ठरविण्यात आले. लेकरांसंबंधीच्या सेवेच्या खात्याने किडस् फर्स्ट क्लब, कॅरवान क्विझ आणि इतर कार्यक्रम ठरविले. वडील लोकांच्या सेवेसंबंधीच्या खात्याने ले-सभासदांचे प्रशिक्षण व त्यांचा अभ्यासक्रम ठरविला. या खात्यानेच कुटूंब, पुरुषवर्ग, स्त्रीवर्ग, वरीष्ठ वडील वर्ग आणि लग्न न झालेला वडील वर्ग यासाठी विशेष कार्यक्रम व अभ्यासाची योजना आखली.

आज सन्डेस्कूल म्हणजे एका विशिष्ट ठिकाणी असलेली किंवा विशिष्ट वेळी ठरलेली सेवा राहीलेली नाही. परंतू ज्याठिकाणी शिष्यत्व सुरु होते,. पुढारीपण विकसीत होते त्या ठिकाणची ती सेवा झालीआहे. व या सेवेद्धारेच आम्ही तारणाचा व पवित्रीकरणाचा संदेश प्रत्येक पिढीला लहानापासून तर मोठ्यापर्यंत देत आहोत.

http://nazarene.org/ministries/administration/visitorcenter/articles/display.aspx

# आम्ही साजरे करीत आहोत.....
# ''तरुण पिढीच्या सेवेचे शतक''

सुरुवातीच्या काळात तरुणींमध्ये काम करणारी ''कंपनी इ'' व तरुणांमध्ये काम करणारी ''ब्रदरहूड ऑफ सेंट स्टीफन'' या संस्थांनी तरुण लोकांना शास्त्राभ्यास, प्रार्थना, साक्ष देणे, व सुवार्ताकार्याचे प्रशिक्षण घेणे यासाठी उत्तेजन दिले. तरुणांमध्ये काम करणाऱ्या पुढाऱ्यांनी १ ले तिमथ्यी ४:१२ मध्ये लिहिल्यानुसार ''तुझ्या तारुण्याला कोणी तुच्छ मानू नये, तर भाषण, वर्तन, प्रीती, विश्वास व शुद्धता ह्या विषयी विश्वास ठेवणाऱ्यांचा कित्ता हो'' हे आपले ध्येय वाक्य घेतले.

या पायावर आधारीत तरुण लोकांमधील सेवा वाढत गेली. १९०८ मध्ये तरुण सभासदांची संख्या ७२३ होती व १९२३ मध्ये जेव्हा अधिकृतपणे तरुण संघ (नॅझरीन यंग पिपल्स सोसायटी) स्थापन झाला तेव्हा १२,७६८ सभासद होते. तरुण संघ हा आंतरराष्ट्रीय संघ आहे हे दर्शविण्यासाठी १९७२ मध्ये त्याचे नाव ''नॅझरीन युथ इंटरनॅशनल'' (NYI) हे करण्यात आले.

नॅझरीन तरुणांची चळवळ अशा रीतीने जागतिक संस्था झाली व त्याद्वारे सेवेची संधी उपलब्ध करणे कॅम्पस, कॉन्फरन्सेस भरविणे, मिशन कार्याचे अनुभव सांगणे व प्रशिक्षण देणे इत्यादी बाबी होऊ लागल्या. आज (NYI) चे एकूण सभासद ३,८०,००० पेक्षाही जास्त असून प्रत्येक विभागामध्ये तरुणामध्ये कार्य करण्याच्या योजना आखून राबविल्या जातात. ''उच्च ख्रिस्ती जीवन'' यावर आम्ही भर देत आहोत आणि सुवार्ता कार्याच्या योजना, शिष्यत्व व देवाच्या कार्यासाठी तरुणांना एकत्र आणणे हे कार्य बांधत आहोत.

चर्च ऑफ दि नॅझरीनची अधिक माहीती, मंडळीचा विश्वास, प्रमुख मुल्ये व जागतिक सेवाकार्य यांच्या माहितीसाठी खालील वेबसाईट वर जाऊ शकता.

http://nazarine.org

# आम्ही साजरे करीत आहोत.....

# ''आमची प्रमुख मुल्ये''

**आम्ही ख्रिस्ती आहोत,**

ख्रिस्ताच्या जागतिक मंडळीचे सभासद या नात्याने आम्ही खऱ्या विश्वासणाऱ्यांबरोबर येशू ख्रिस्ताच्या प्रभूत्वाची घोषणा करण्यासाठी एकत्र आलेले आहोत. पवित्रतेचा संदेश देण्यासाठी व जॉन वेस्लीच्या पवित्रतेच्या शिक्षणाशी विश्वासू रहाण्यासाठी आम्ही बोलावलेले आहोत. हे पवित्र शास्त्रावर आधारीत शिक्षण म्हणजे देवाची सर्वांसाठी असलेली कृपा, कृपेची साधने, पश्चाताप, विश्वास, नविन जन्म, न्यायीकरण, पूर्ण पवित्रिकरण, खात्री, ख्रिस्ती समाज व त्याचे अनुशासन आणि प्रीतीतील पूर्णता हे होय.

**आम्ही पवित्रतेचा पुरस्कार करणारे आहोत.**

आमचा देव पवित्र देव आहे व त्याने आम्हास पवित्र जीवन जगण्यास बोलावलेले आहे. आमचा विश्वास आहे की पवित्र आत्मा आमच्यामध्ये ''कृपेचे दुसरे कार्य'' व्हावे याचा शोध घेत असतो. ''पुर्ण पवित्रीकरण'' ''पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा'' इत्यादी शब्दांच्या द्धारे हा अनुभव कथन केला जातो. सर्व पापापासून आम्हाला धूवून स्वच्छ करणे, देवाच्या प्रतिमेचे होण्यासाठी पुन्हा नविनीकरण करणे, देवावर व शेजाऱ्यावर प्रीती करण्यासाठी आम्हास उत्तेजीत करणे, आणि आम्हामध्ये ख्रिस्ताचे शिल उत्पन्न करणे या गोष्टी कृपेच्या दुसऱ्या कार्यात घडतात.

**आम्ही मिशन कार्य करणारे आहोत :**

आम्ही पाठविलेले लोक आहोत. ख्रिस्ताच्या पाचारणाला प्रतिसाद देणारे, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने जगात जाणारे, ख्रिस्ताच्या प्रभूत्वाची साक्ष देणारे, ख्रिस्ताची मंडळी बांधण्यासाठी सहभागी झालेले, भक्ती करणारे, सुवार्ता प्रसार करणारे, शिस्त असणारे, आणि सेवाकार्यासाठी तयारी करणारे असे लोक आहोत.

## चर्च ऑफ़ द नॅझरीन च्या इतिहासातील विशेष वर्षे.

१८८७ चर्च ऑफ द नॅझरीनच्या पहिल्या मातृमंडळीची स्थापना. नाव : द पिपल्स् इव्हँजेलिकल चर्च, प्रॉव्हीडंस, ऱ्होड आयलंड.

१८९० ''न्यु इंग्लंड होलीनेस''च्या १० मंडळ्या एकत्र येऊन द सेंट्रल इव्हँजेलिकल होलीनेस असोसिएशन ही संघटीत मिशन संस्था तयारी झाली चर्च ऑफ द नॅझरीनची ही पहीली मिशन संस्था/डीनॉमिनेशन होय.

१८९५ लॉस ऐंजेलीस येथे चर्च ऑफ द नॅझरीनची स्थापना. १९०६ मध्ये चर्च ऑफ द नॅझरीन च्या ४० मंडळ्या होत्या.

१८९५ ब्रुकलीन, न्यु यार्क येथील ३ मंडळ्या एकत्र येऊन. ''असोसिएशन ऑफ पेंटीकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका'' या मिशन संस्थेची स्थापना.

१८९६ सेंट्रल इव्हँजेलिकल होलीनेस असोसिएशन व असोसिएशन ऑफ पेंटीकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका एकत्र आल्या. १९०७ मध्ये एकत्र आलेल्या या संस्थेच्या ५० मंडळ्या होत्या.

१८९८ असोसिएशन ऑफ पेंटीकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका या संस्थेचे पहिले मिशन कार्य भारतामध्ये सुरू झाले. भारत हा युरेशिया रिजन मध्ये आहे.

१८९८ पेंटीकॉस्टल अलायंस (नंतरचे नामकरण : पेंटीकॉस्टल मिशन) ची स्थापना नॅझविले, टेनिसी येथे झाली.

१८९९ टेक्सास होलीनेस युनिव्हर्सिटी ची (पेनिएल युनिव्हर्सिटीची) स्थापना. हे चर्च ऑफ द नॅझरीनचे पहिले कॉलेज व सदर्न नॅझरीन युनिव्हर्सिटीची मातृसंस्था होय.

१९०१ असोसिएशन ऑफ पेंटिकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका या संस्थेची 'केप वर्दे' येथे कामाची सुरूवात. भारतानंतर हा दुसरा देश (आफ्रीका रीजन) ज्यामध्ये कामाची सुरूवात झाली.

१९०१ पेंटिकॉस्टल मिशनचा ग्वाटेमाला या देशात प्रवेश. मिशन कार्याची सुरूवात झालेला तिसरा देश.

१९०२ पेंटिकॉस्टल मिशनचा कयुबा या देशात प्रवेश. मिशन कार्याची सुरूवात झालेला चौथा देश. (कॅरीबीयन रिजन)

१९०२ असोसिएशन ऑफ पेंटिकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका या संस्थेचा कॅनडामध्ये कार्याचा आरंभ. हा पाचवा देश.

१९०३ इंडीपेंडंट होलीनेस चर्च चा 'मेकसीको'मध्ये प्रवेश. हा सहावा देश.

१९०४ 'इंडीपेंडंट होलीनेस चर्च' व 'न्यु टेस्टामेंट चर्च' एकत्र येऊन 'होलीनेस चर्च ऑफ ख्राईस्ट'ची स्थापना. १९०८ मध्ये या संस्थेचे कार्य जॉर्जीया पासून न्यू मेक्सीको पर्यंत होते.

१९०४ अमेरिकेमध्येच लॉस एंजेलीस येथे चिन मधून स्थलांतरीत झालेल्यांमध्ये कार्याची सुरुवात.

१९०६ ग्लास्गो येथे पार्कहेड पेंटीकॉस्टल चर्चची स्थापना. पेंटीकॉस्टल चर्च ऑफ स्कॉटलंडची ही मातृमंडळी. हा सातवा देश.

१९०७ असोसिएशन ऑफ पेंटीकॉस्टल चर्चेस ऑफ अमेरिका आणि चर्च ऑफ द नॅझरीन एकत्र येऊन 'पेंटीकॉस्टल चर्च ऑफ द नॅझरीन' ची स्थापना शिकॅगो इलीनॉइस येथे झाली. येथेच पहीली जनरल असेंब्ली झाली.

१९०७ जपानमध्ये सेवाकार्याचा आरंभ. मिशन कार्य सुरु झालेला आठवा देश.

१९०८ ''होलीनेस चर्च ऑफ ख्राईस्ट'' ही मिशन संस्था ''पेंटीकॉस्टल चर्च ऑफ द नॅझरीन'' या संस्थेबरोबर पायलट पॉईंट, टेकसास येथे दुसऱ्या जनरल असेंब्लीच्या वेळी येऊन मिळाली. ऑक्टोबर ८, १९०८ ही तारीख ''चर्च ऑफ द नॅझरीनच्या'' स्थापनेचा दिवस म्हणून नंतर ठरविण्यात आला.

१९११ स्वाझीलंड मध्ये मिशन कार्याची सुरुवात, आफ्रीका खंडातील पहिला देश.

१९११ तिसऱ्या जनरल असेंब्लीमध्ये प्रकाशनाच्या कार्यासंबंधीच्या कार्यावर जोर देण्यात आला.

१९११ लुइसिआना कॉन्फरन्स ऑफ दि प्रोटेस्टंट मेथॉडिस्ट चर्च, पेंटिकॉस्टल चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले.

१९१२ नॅझरीन पब्लीशींग हाऊस ची सुरुवात कॅनसास सीटी येथे झाली. हेरल्ड ऑफ होलीनेस हे नॅझरीन चे मुखपृष्ठ म्हणून प्रकाशित होऊ लागले.

१९१३ द अदर शीप (नंतरचे नामकरण वर्ल्ड मिशन) हे मासिक सुरु झाले.

१९१३-१४ एच आर रेनॉल्डस् जनरल सुपरिटेंडेंट यांचा जागतिक प्रवासामुळे अनेक नविन मिशन कार्याला सुरुवात झाली.

१९१५ पेंटीकॉस्टल मिशन, पेंटीकॉस्टल चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले त्यामुळे दक्षिण-पूर्व अमेरिका, भारत, कयुबा, मेक्सिको आणि ग्वाटेमाला येथे मिशन कार्याला जोमाने सुरुवात झाली.

१९१५ पेंटीकॉस्टल चर्च ऑफ स्कॉटलंड हे पेंटीकॉस्टल चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले.

१९१५ वूमन्स मिशनरी सोसायटी (आता नॅझरीन मिशन इंटरनॅशनल) ह्या खात्याला चौथ्या जनरल असेंब्लीच्या वेळी विशेष मान्यता मिळाली.

१९१७ 'पेरू' देशात मिशन कार्याला सुरूवात. (साउथ अमेरिकन रीजन)

१९१९ पाचव्या जनरल असेब्लीमध्ये ''पेटीकॉस्टल चर्च ऑफ द नॅझरीन''चे नाव ''चर्च ऑफ द नॅझरीन'' असे करण्यात आले.

१९१९ अमेरिकन इंडीयन्स या समाजात कार्याला सुरूवात.

१९१९ व्ही. जी. सॅन्टीन हे मेक्सिको मधील त्या देशाचे पहिले प्रांताध्यक्ष झाले.

१९२३ नॅझरीनच्या जागतिक मंडळी साठी जमा केल्या जाणाऱ्या बजेटसाठी जनरल बोर्डची स्थापना झाली.

१९२३ नॅझरीन यंग पिपलस सोसायटी (आता नॅझरीन युथ इंटरनॅशनल) ला विशेष मान्यता मिळाली.

१९२५ दोन हॉस्पीटलची स्थापना : ब्रीझी मेमोरीअल (चिन) आणि रॅलेह फिटकीन मेमोरीअल (स्वाझीलंड)

१९२६ 'द प्रिचर्स मॅगझीन' ची सुरूवात.

१९३० जागतिक मिशन कार्यासाठी पहिले इस्टर दान घेतले.

१९३८ रेनॉल्डस् मेमोरीअल हॉस्पीटलची भारतामध्ये सुरूवात.

१९४५ 'ऑस्ट्रेलियन डीनॉमिनेशन' चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले.

१९४५ ''नॅझरीन थिऑलॅजीकल सेमेनरी''ची कॅन्सास सिटी येथे स्थापना.

१९४५ ''शॉवर्स ऑफ ब्लेसींग'' या रेडीओ कार्यक्रमाची सुरूवात.

१९४६ नॅझरीनच्या मुख्यालयात ''स्पॅनिश डीपार्टमेंट''ची सुरूवात.

१९४८ मिशन कार्यासाठी ''अलाबास्त्र दान'' पहिल्यानेच घेण्यात आले.

१९४८ इटालीयन मंडळ्या नॅझरीनला येऊन मिळाल्या.

१९५२ इंटरनॅशनल होलीनेस मिशन (इंग्लंड व दक्षीण आफ्रीका) चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले.

१९५३ 'ला होरा नॅझरीना' हा रेडीओ कार्यक्रम सुरू झाला.

१९५५ युनायटेड कींगड्म मधील 'कॅल्वरी होलीनेस चर्च' चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले.

१९५८ कॅनडामधील 'गॉस्पल वर्कर्स' चर्च ऑफ द नॅझरीनला येऊन मिळाले.

१९५८ सुवर्ण-महोत्सव पायलट पॉईंट, टेकसास येथे साजरा करण्यात आला.

१९६४ कॉलेज विद्यार्थ्यांची मिशन टिम 'नॅझरीन इव्हँजेलीस्टीक अंबॅसॅडर्स' तयार करण्यात आली.

१९६७ कुडजीप, पापुआ न्यु गीनी येथे नॅझरीन हॉस्पीटल सुरू करण्यात आले.

१९७४ पहिली ''वर्ल्ड युथ कॉन्फरन्स'' स्वित्झरलंड येथे भरविण्यात आली.

१९७५ शहरांमध्ये मिशन कार्य करण्यासाठी वॉशिंग्टन डी. सी. येथे 'कम्युनिटी ऑफ होप' ची निर्मिती करण्यात आली आणि याच कार्यासाठी न्युयॉर्कला 'लॅब्स् थिएटर' तयार करण्यात आले.

१९७५-७६ हैती येथील दुष्काळ व ग्वाटेमाला येथील भूकंप यामुळे दयार्थ सेवा (कंपॅशनेट मिनिस्ट्रीज) करण्यासाठी आवश्यकता निर्माण झाली.

१९७६ नॅझरीन मंडळीची आंतरराष्ट्रीय रचना कशी असावी यावर विचार व्हावा हे जनरल असेंब्ली मध्ये ठरविण्यात आले.

१९८० जनरल असेंब्लीने 'आंतरराष्ट्रीय तत्व' स्विकारले व जागतिक मंडळीचे विभागामध्ये (रीजन्स) विभागणी केली.

१९८४ वर्ल्ड मिशन डिव्हीजन मध्ये कंपॅशनेट मिनिस्ट्रीजचे ऑफीस उघडण्यात आले.

१९८८ नायजेरीयातील स्वतत्वावर चालणारे नॅझरीन चर्च, चर्च ऑफ द नॅझरीन मध्ये विलीन झाले.

१९९३ इंटरनॅशनल बोर्ड ऑफ एज्युकेशनची निर्मिती झाली.

१९९७ 'हेरल्ड ऑफ होलीनेस' व 'वर्ल्ड मिशन' या दोन मासिकांना एक करुन ''होलीनेस टूडे'' या मासिकाची निर्मिती झाली.

१९९८ अमेरिका-कॅनडा येथील नॅझरीन सभासद जगातील इतर देशातील नॅझरीन सभासदांपेक्षा संख्येने कमी झाले.

२००८ चर्च ऑफ द नॅझरीनच्या शताब्दी महोत्सव प्रत्येक स्थानिक मंडळीमध्ये साजरा करण्यात येत आहे. १५१ देशांमध्ये (जागतिक क्षेत्रांमध्ये) १६ लाखांपेक्षा जास्त सभासद हा सण साजरा करीत आहेत.

## नॅझरीनचे मुळ : मातृ मंडळ्या / संस्था

**१८८७-१९०८**

अमेरिका व ग्रेट ब्रिटन येथील वेस्लेच्या पवित्रतेच्या तत्त्वावर विश्वास ठेवणाऱ्या सात मिशन संस्था एकत्र येऊन चर्च ऑफ दि नॅझरीनची निर्मिती झाली.

## संघटीत होण्याचा काळ

**१८९६-१९२२**

पवित्रतेच्या तत्वावर विश्वास ठेवणाऱ्या सात मिशन संस्था व आठव्या मिशन संस्थेचा काही भाग १९१५ पर्यंत एकत्र आला व एकसंघ नॅझरीन मंडळी (संस्था) तयार झाली.

## अधिक संघटीत होण्याकडे वाटचाल

**१९११ - १९२८**

या काळात समान कार्यक्रम हाती घेऊन वरील संस्था एकत्र आल्या. तसेच नॅझरीन पब्लीशींग हाऊसची स्थापना करुन 'हेरल्ड ऑफ होलीनेस' हे मासिक सुरु करण्यात आले. हिराम एफ रेनॉल्डस्, जनरल सुपरिटेंडेंट यांनी ''सर्व जगाला सूवार्ता'' या घोषवाक्याचा पुरस्कार केला. नॅझरीन कॉलेजेसची वाढ झाली.

## संकटकाळातही चिकाटी

**१९२८-१९४५**

आर्थिक आपत्कालीन स्थीती व दुसरे महायुद्ध यामुळे काही मिशनकार्याची क्षेत्र बंद करण्यात आली व मिशन कार्य मर्यादीत क्षेत्रातच सुरु राहीले. परंतू या परिस्थितीतही चीन, स्वाझीलंड व भारत या देशामध्ये दवाखाने सुरु केले.

## शतकाच्या मध्यकाळातील आत्मे जिंकण्याची मोहीम

**१९४५-१९६०**

दुसऱ्या महायुद्धानंतर नविन देशामध्ये जाण्याचा मार्ग उघडला व नविन संस्था/मंडळ्या नॅझरीन मध्ये येऊन मिळाल्या. हा मधला काळ म्हणजे नॅझरीन मिशन कार्याच्या जाणिवेचा काळ असे म्हणता येईल, पहिली सेमिनरी व रेडिओ कार्यक्रमांची सुरुवात (अनेक भाषांमध्ये) या काळात झाली.

## दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सुवार्ताप्रसाराचा मुख्य प्रवाह

**१९६०-१९८०**

आफ्रीका खंड व आशीया खंड यातील स्वतंत्र झालेली राष्ट्रे आणि त्या काळातील सामाजिक क्रांती यामुळे १९६० च्या दशकात जागतिक सुवार्ताकार्यासाठी व मंडळीतील तरुण वर्गात कार्य करण्याच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. लॉस्ट ॲन्ड फाऊंड सारखे संगीताचे गट सुवार्ता कार्यासाठी 'स्टूडंट मिशन कार्य' सारखे समुह स्थापन झाले. १९७० च्या दशकात शहरी कार्य व कंपॅशनेट मिनिस्ट्रीज ने मंडळीची अंतःकरणे पुन्हा काबीज केली.

## आंतरराष्ट्रीयत्वाचे युग

### १९७६ - २००३

१९८० मध्ये जनरल असेंब्लीने ''आंतरराष्ट्रीयत्वाचे तत्व'' अवलंबिले जेणेकरून सामाजिक व राष्ट्रीय पातळ्या उंचावल्या गेल्या. नविन क्षेत्रांचा आकडा वाढला, चर्च वाढ झपाट्याने झाली. १९८० मध्ये असलेली ६,७४,००० सभासद संख्या २००५ मध्ये १४ लाखापेक्षा जास्त झाली. सामाजिक कार्याच्या नविन रुपांचे 'नॅझरीन कंपॅशनेट मिनिस्ट्रीज' या संस्थेत रुपांतर झाले.